स्थानिक पातळीवर भाजीपाला उत्पादन

Usha S, Manju M Nair and Devika A S

कोरोना महामारी च्या काळात पूर्वीपेक्षा अधिक रोग प्रतिकारशक्ती निर्माण करणे महत्वाचे ठरले आहे. केरळमधील शेतकरी आणि काही नागरिकांनी परसबागांमध्ये आणि घरांच्या छप्परांवर निरनिराळे प्रयोग करून सुरक्षित आहार वाढविण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. त्याद्वारे आरोग्यदायी आणि पौष्टिक अन्न सेवनाची ते खात्री वाढवतात.



सहभागी हमी योजने अंतर्गत प्रमाणित शेतकरी-साजी कुमारी सेंद्रीय बाजारपेठेत भाजीपाला पुरवितांना

केरळ राज्यात गेल्या २-३ दशकांत शहरीकरणाची प्रक्रिया मोठ्या जलद गतीने झाली. त्याच सोबत शहरी ग्राहकाची मानसिकता देखील लोकांमध्ये वाढलेली दिसते. गेल्या १०-१५ वर्षात आमची संस्था, हे अनेक वेगवेगळ्या संघटनांनी केरळमध्ये सेंद्रिय भाजीपाला लागवडीसाठी अनेक प्रयत्न केले व आज ही करीत आहेत. या प्रयत्नाचा प्रभाव म्हणून असे दिसते की अनेक शहरी वस्त्यांमधील, आरोग्याबद्दल जागरूक असलेल्या लोकांमध्ये बदल झाला व ते त्यांच्या गरजे एवढा भाजीपाला घरामागील परसबागेत किवा गच्चीवर पिकवू लागले. त्यांच्या पैकी बरेच जण शेजाऱ्यांना भाजीपाला वाटू लागले तर काहीजण समविचारी लोकांसोबत आठवडी बाजारात भाजीपाला विक्री करू लागले.

कोविड -१९ मुळे झालेले बदल

कोविड -१९ महामारी व लॉकडाऊन हा प्रसंग एक मानवी जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी कारणीभूत ठरला. लॉकडाउनसारख्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर तयार राहण्यासाठी केरळचे मुख्यमंत्री पिनाराय विजयन यांनी भाज्या व कंद यासारख्या स्थानिक खाद्य उत्पादनांद्वारे, अन्नविषयक स्वयंपूर्णराहण्याचे आवाहन केले. कृषी संचालक डॉ. के. वासुकी यांनीही तरुण स्वयंसेवकांना प्रोत्साहन देऊन स्थानिक शेतात आणि घरीच धान्य पिकविण्याच्या चळवळीवर जोर दिला. मागील तीन महिन्यांत, राज्याने एकात्मिक अन्न सुरक्षा प्रकल्प सुरू केला ज्यामध्ये घरावर शेती करण्यास आणि ओसाड जमिनींना पुनरुज्जीवन देण्यास प्रोत्साहित केले. यामध्ये मुख्यत: वैयक्तिक वापरासाठी भाजीपाला पिकवणे व पशुधन जोपासणे ह्यावर भर दिला गेला. यामध्ये मीडिया, विशेष करून सोशल मीडियाने लोकांना भाजीपाला परसबागेत पिकवण्याकरिता प्रोत्साहित करण्यासाठी चांगली भूमिका बजावली तसेच कृषी विभागाने सुद्धा भाजीपाला बियाणे पुरवण्यास मदत केली. शेतकऱ्यांसोबत काम करणाऱ्या अनेक संघटनांनीसुद्धा स्थानिक बियाणे वाटप कार्यक्रम हाती घेतले. जरी याला नैसर्गिक शेती म्हणून संबोधले नाही तरी, या रोपांची किवा पिकांची जास्त काळजी घेतली जाते, त्यामध्ये - खते (मुख्यत: वाळलेले शेणखत) आणि कीटकनाशके (औषधी वनस्पती, कडुनिंब तेल, कंठारी मिरची, लसूण आणि साबण) मोठ्या प्रमाणात वापरले जातात. लॉकडाऊनमध्ये व लॉकडाऊन नसताना यामधून निघणारे उत्पादन शेजाऱ्यांना वाटप करण्यात आले. लोक त्यांच्या घरामागील परसबागेत लहान प्लॉटमध्ये चिनी बटाटा, अळूची पाने (कोलोकासिया), साबुदाणा (ट्यॉपिओका), सुरण इत्यादी ची लागवड देखील करू लागले.

ओसाड जमिन ते लागवडी योग्य जमीन

मागील दोन दशकांपासून एक स्वयंसेवी संस्था म्हणून शेतक-यांसोबत काम करत असताना एप्रिल पासून "फुडस्फेप" नावाने कार्यक्रम अंतर्गत सुरू करण्यात आला. ओसाड जमिनीचे लागवडीलायक जमिनीत रूपांतरण करणे हे या प्रकल्पाचे ध्येय आहे. लोकांकडून पैसे जमा करायचे आणि जेव्हा त्या जमिनीतून पिके घेतली जातात तेव्हा त्यांना शेतमाल स्वरुपात त्यांचे पैसे परत करायचे, अशी संकल्पना होती.

कृषी व तंत्रज्ञानाचा वापर करून कीटक व रोगांचे व्यवस्थापन, बियाणे व जैव खते यांचा वापर, प्रशिक्षण आणि हाताळणी यासारख्या प्रयत्नातून शेतकरी व ग्रामीण तरुणांना प्रवृत्त केले गेले. मागील दोन महिन्यांत जैविक पद्धतीने जमिनीचे व्यवस्थापन, कीड व रोगांचे

व्यवस्थापन यासह अन्य विषयांवर जवळजवळ ८०० शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. यामध्ये पलक्कड जिल्ह्यातील अट्टप्पाडी व पठाणमथिट्टा जिल्ह्यातील नारनमोजी या दोन जिल्ह्यातील आदिवासींचा सहभाग होता. गेल्या २०-३० वर्षात या ठिकाणी विविध कारणांमुळे अन्नधान्य उत्पादन कमालीचे घटले होते.

अनुसूचित जमाती विकास विभागाच्या सहकार्याने आम्ही २०१९ पासून अटप्पापडीतील १९ गावात अ ग्रोइकॉलॉजीद्वारे ''पोषण पुरकता'' या विषयावर काम करीत आहोत. या प्रायोगिक प्रकल्पाचा उद्देश '' पंचकृष्ण नावाच्या त्यांच्या पारंपारिक शेतीला पुनरुज्जीवित करणे आणि त्यांच्या भरड धान्य आधारित अन्न प्रणालीचे पुनरुज्जीवन करणे आहे. जेव्हा आम्ही ह्या प्रकल्पाला सुरुवात केली तेव्हा पुरुष स्त्रिया आणि वडील मंडळीमध्ये मोठा उत्साह होता. बरेच सुशिक्षित तरूण ज्यांच्याकडे उदरनिर्वाहासाठी काम नाही ते ह्या प्रकल्पात जुळले व त्यापैकी काही पंचकृषी व नवीन कृषीशास्त्र समजून घेण्यासाठी एकत्र आले. त्यांनी प्रायोगिक तत्वावर समाजातील वडीलधा-यांच्या मदतीने बियाणांच्या देशी वाणाचे जतन करण्यास सुरुवात केली व त्याला '' वेद वल्ली '' म्हणजे '' बियाणाची टोपली '' असे नाव दिले.

एकदा त्यांनी आंध्रप्रदेशातील समुदायाने व्यवस्थापन केलेल्या नैसर्गिक शेतीबद्दल ऐकले व आमच्याशी संवाद साधून तो जाणून घेण्याचा प्रयत्न केला. ब-याच शेतक-यांनी त्यांना त्यांच्या शेतीमध्ये प्रयोग करण्यास पाठींबा दर्शविला. अचानक कोविड-१९ मुळे सर्व काही अडकले. पहिल्या लॉकडाऊन दरम्यान आम्ही टीमच्या महत्वाच्या सदस्यांशी संवाद साधला. जेव्हा लॉकडाऊन पूर्णपणे संपले, तेव्हा आम्ही तरुण व वृद्ध शेतकरी ज्यांना देशी अन्नधान्य व नैसर्गिक शेती मध्ये रुची आहे यांच्या मदतीन ''फुडस्केप'' प्रकल्पाचा शुभारंभ केला. त्यांच्याकडे उत्साह व मानवी संसाधने होती परंतु आर्थिक बाबींची कमतरता होती. त्यांना प्रती एकर ५००० रू. अग्रिमराशीची आवश्यकता होती. ''फुडस्केप'' प्रकल्पाच्या मदतीने थनालने ही मदत उभी केली. बरेच मित्र व ग्राहक पैसा देण्यासाठी पुढे आले. अन्नधान्य, कडधान्य व भाजीपालाच्या स्वरुपात त्या पैशाची परतफेड करणे हे आमचे त्यांना आश्वासन होते. पण त्यापैकी अनेकांनी कशाचीच अपेक्षा ठेवली नाही हे पाहून खूप आनंद झाला.

शेतकऱ्यांनी त्यांची जमीन नांगरून पेरणी करण्यास सुरुवात केली आहे व आमची युवा टीम त्यांच्यासोबत समन्वय साधून प्रकल्प राबवत आहे. त्यांनी स्वत: काही जमीन भाडेतत्वार घेऊन सेंद्रिय भाजीपाला उत्पादन सुरू केले व सोबतच इतर शेतकऱ्यांना देखील मदत देत आहेत. आम्ही युवा कार्यकर्त्यांसाठी नैसर्गिक शेती आणि कृषीशास्त्र विषयी ऑनलाईन प्रशिक्षण घेतले. विशेषत: कीटक आणि रोग व्यवस्थापन आणि जैविक खत निर्मिती या विषयावर ६ सत्र

थनाल कडून सेंद्रिय भाजीपाला लागवडीस सुरुवात

२००१ ला त्रिवेंद्रम जिल्ह्यात आम्ही दोन पंचायती सोबत काम करण्यास सुरुवात केली. हा आमचा प्रायोगिक तत्वावर कोवलम जवळील महिला शेतक-यांसोबतचा सेंद्रिय शेतीबद्दलचा पहिलाच प्रयोग होता. केरळमध्ये कीटकनाशके सामान्यतरू एन्डोसल्फान वर जोरदार चर्चा सुरू होती ज्यामध्ये कीटकनाशकाविषयी माहिती पोहोचविण्यात थणालने महत्त्वाची भूमिका बजावली. ह्या प्रकल्पाने दाखवून दिले कि, रासायनिक कीटकनाशकांशिवाय शेती केली जाऊ शकते. अन्नधान्य उत्पाद आणि अन्नामध्ये स्वयंपूर्ण होण्यासाठी केरळमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा व टीका होत असते. त्यामध्ये शास्त्रज्ञ देखील सहभागी होते. केरळ मधील 'कमी जमीन धारणा' ही त्यामागची एक मोती समस्या आहे असे मानले जाते. जमीन धारणा कमी असली तरी त्या क्षेत्रफळा मधून किती उत्पादन मिळू शकते आणि लहान शेतकरी भाजीपाला उत्पादनामध्ये कसे येऊ शकतात हे दर्शविणे हा आमच्या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता. केरळमध्ये चांगले हवामान व माती असून ती फळझाडे व भाजीपाला लागवडीस योग्य आहे. अगदी कमी जमिन धारणा असलेल्या महिलांच्या ३ बचतगटांपासून आम्ही सुरुवात केली. एका वर्षाच्या कालावधीत त्यांनी मोठे यश दाखवले आणि पंचायतीने त्यांना सेंद्रिय भाजीपाला आणि केळीच्या उत्पादनाचे नियोजन करण्याच्या मदतीसाठी आम्हास आमंत्रित केले. पुढे थनल ला याचा उपयोग केरळ राज्य सरकार सोबत सेंद्रिय शेती धोरण विकसित करण्याकरिता मदत झाली.

घेण्यात आले. आम्ही त्यांना इतर संस्थांव्दारे आयोजित केलेल्या नैसर्गिक शेतीच्या ऑनलाईन अभ्यासक्रमांना उपस्थित राहण्यास प्रोत्साहित केले. पठाणमथिट्टा जिल्ह्यातील आणखी एक आदिवासी समाज कामासाठी बाहेर जाऊ शकला नाही. आणि स्थानिक पातळीवर कोविडमुळे जास्त काम उपलब्ध नव्हते. त्यांच्या पैकी सुमारे ४८० लोकांना १३ प्रकारचे भाजीपाला बियाणे, जैवीय संसाधने आणि सेंद्रिय भाजीपाला लागवड कशी करावी यासंबंधी मार्गदर्शन केले. पण मध्येच मुसळधार पावसामुळे त्यातील अनेकांना काम सुरू करता आले नाही. दरम्यान,आम्ही या गटातील निवडक लोकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना आखत आहोत.

सामुदायिक परसबाग

स्थानिक अन्न उत्पादनाचे महत्व समजल्यानंतर केरळमधील सर्व पंचायतींनी लॉकडाऊन दरम्यान सामुदायिक परसबागा सुरू केल्या. आम्ही शहराच्या जवळच असलेल्या त्रिवेंद्रममधील कराकुलम पंचायतीमध्ये काम करण्यास सुरूवात केली. पण अजूनही तिथे बरेच लहान व अल्पभूधारक शेतकरी आहेत. आमच्यासोबत काम करण्यास पंचायत खूप उत्साही होती. सुमारे १३० शेतकऱ्यांना,(त्यातील बऱ्याचशा महिला शेतकरी होत्या) विविध प्रकारचे भाजीपाला बियाणे

आणि जैविक संसाधने असणारी फारमिंग किटस उपलब्ध करून दिली, ज्यामुळे मातीची प्रतवारी सुधारण्यास मदत होईल. काही निवडक शेतकऱ्यांना सेंद्रिय भाजीपाला लागवडीबद्दल दोन वेळा प्रशिक्षण देण्यात आले. मागील महिन्यात सरकारने कोविडच्या स्थितीमुळे कडक निर्बंध घातले असल्यामुळे प्रत्यक्ष प्रक्षेत्रात जाऊन काम करण्यास व आमच्याकडे नोंदणी असलेल्या व बियाणे घेतलेल्या शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहचणे कठीण झाले. परंतु त्यांनी लागवड सुरू केली असून या पंचायतीत मोबाइल सेंद्रिय ॲग्रो क्लिनिक सेवा चालविण्याची आमची योजना आहे.

माझ्या परसबागेतील आव्हाने

साथीच्या रोगाने आमच्या कार्यकर्ता टीम मध्ये आणि आमच्याशी जवळून जोडलेल्या शेतक–यांमध्ये खूप गोंधळ उडाला होता कारण ते पुढे जाऊ शकले नाहीत, काही कामे संपवू शकले नाहीत, शेतकऱ्यांना भेटू शकले नाहीत, त्यांना सामावून घेवू शकले नाहीत आणि त्यांच्या कौशल्याचा उपयोग करू शकले नाहीत. मग आम्ही सेंद्रिय शेतीबद्दल या सर्वांमध्ये गांभीर्य आणण्यासाठी श्माय फूड गार्डन चॅलेंजेस, अशी मोहीम सुरू केली. आम्ही एक व्हाट्सएप ग्रुप तयार केला आणि शेतीचे फोटो, कीड व रोग व्यवस्थापन, माती व्यवस्थापन, जागेची समस्या इ. बाबीं हाताळण्याकरिता छायाचित्रे एकमेकाला पाठवण्यास सुरू केले. हे इतके मनोरंजक व अर्थपूर्ण झाले की जणू प्रत्येकाची एक स्वतंत्र यशोगाथाच बनली. त्या सर्वांना वाटते आपली यशोगाथा सर्वांना सांगावी. त्यातील एक दोन कथा आम्ही सांगतोच.

''जेव्हा मी १२ वर्षांपूर्वी थणालमध्ये रुजू झालो तेव्हा माझा सेंद्रिय भाजीपाला बागकामाचा विषय सुरू झाला. गेल्या वर्षी, मी एका नवीन ठिकाणी स्थलांतरीत झालो आणि तिथेही मी छताच्या माथ्यावर भाज्या पिकविण्यास सुरुवात केली. थनाल कडून रोपे वाढवण्यासाठी मिळालेल्या पिशव्या व बियाणे मी माझ्या काही शेजाऱ्यांना सेंद्रिय भाजीपाला लागवडीस प्रोत्साहित करण्यासाठी वाटून दिल्या. मी भेंडी, मिरची, वांगे, दुधीभोपळा इत्यादीची लागवड केली. आम्ही आता बियाणे, रोपे, काढणी सामायिक करतो त्यामुळे समुदाय जवळ आला आहे. माझा स्वत:चा शेतीबद्दलचा अनुभव व थनाल येथील कार्यक्रम अधिकारी अरुण यांच्या मार्गदर्शनामुळे आता अनेक शेतकऱ्यांना जैविक कीड नियंत्रण व जैविक खते याविषयी काही गोष्टी शिकवतो. पुढची पायरी म्हणून, आमच्या समाजात थानल मोबाईल ॲहग्री क्लिनिक टीममार्फत प्रशिक्षण वर्ग आयोजित करून मी शेती मंडळाचा विस्तार करण्याचा विचार करीत आहे. कोरोना साथ कधी एकदाची संपते याची आम्ही वाट पाहत आहोत की जेणे करून अजून काही शेतकऱ्यांना आम्ही सामावून घेऊन आमचा समूह आम्ही स्वयंपूर्ण करू असे कोवळम जवळील वेलार गावातल्या प्रमिला सांगतात.

सेंद्रिय बाजाराचे व्यवस्थापक दीपक म्हणतात, ''आमच्यापैकी सातजणांनी सेंद्रिय शेतकरी मित्राकडून दीड एकर जागा भाडेतत्त्वावर घेतली असून 'वेनाड सेंद्रिय फार्म' या उपक्रमाला सुरुवात केली आहे. केळी, आले, हळद, याम, तारो, बटाटे, टोमॅटो, मिरची, वांगे, कारले, कोबी, भोपळा, तोंडली, लौकी ही मुख्य पिके आहेत. आम्ही इनपुटवर कोणत्याही प्रकारचा खर्च न करता आत्मनिर्भरता मिळवण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणजेच आम्ही संपूर्ण शेती स्वत:च करतो, घरातील बियाण्यांमधून स्वत:च रोपांची लागवड करतो, स्वत:ची जैव खते बनवतो, जैविक कीटनाशके तयार करतो, कुंपण घालतो, कुंड्यांमधील माती बदलतो, मासे तलावात पाळतो, त्यांचे खत बनवतो, तसेच कालव्याचे पाणी शेताला देतो. आंतरपिके म्हणून केळीच्या पिकामध्ये वांग्याची व काकडीच्या दरम्यान याम व अळूकंदची लागवड करतो. हळद वा आले या पिकामध्ये असलेले कीटक नियंत्रणाचे गुणधर्म लक्षात घेऊन आंतरपिक म्हणून त्याची लागवड करतो. पिकात आच्छादनाच्या महत्वामुळे पालापाचोळा व ज्यूट पिकाचे अवशेष वापरले जातात. आमचे लक्ष केळी आणि सेंद्रिय बाजारामध्ये कमतरता असलेल्या भाजीपाला पिकविण्यावर आहे. आम्ही आमचे कुंड्याकरिता बनविलेले सेंद्रिय मिश्रण देखील विक्रीस सुरुवात केली आहे. ज्याने आम्ही केलेल्या खर्चाचा एक भाग परत मिळण्यास मदत होते. आम्ही दररोज सकाळी लवकर जवळजवळ ३ तास काम आपल्या प्लॉटमध्ये करत असतो. जरी आपण सर्वजण बऱ्याच वर्षांपासून शेतीमध्ये सक्रिय असलो तरी, पहाटे निसर्गासह काम केल्याने उत्तेजना मिळून दिवसभर सक्रिय ठेवते. आमच्या आरोग्य आणि उर्जा पातळीतही बरीच सुधारणा झाली आहे.''

रोग प्रतिकारशक्ती निर्माण करणे हा एक केरळच्या लोकांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण भाग बनला आहे. निरोगी आयुष्यासाठी पौष्टिक आहार, विशेष करून फळे आणि भाज्या खाणे फार महत्वाचे आहे. केरळची भौगोलिक परिस्थिती आणि जमीन ही फळे व भाजीपाला लागवडीसाठी योग्य आहे. कृषी विभागाने राज्यात सुमारे १ लाख हेक्टर पडीक जमीन शोधून काढली असून ती लागवडीखाली आणता येईल, असे प्रयत्न करीत आहे.

बरेच सुशिक्षित तरुण लोक ''आता माझे भोजन माझी जबाबदारी'' याबद्दल जाणीवपूर्वक बोलत आहेत हे पाहायला खूप समाधानकारक व आशादायक वाटते.

Usha S
Thanal, OD-3,
Jawahar Nagar, Kowdiar P.O
Thiruvananthapuram - 695003, Kerala.
E-mail: ushathanal@gmail.com

अनुवाद : डॉ. मंगेश घ. सोनवाणे

Source : Producing vegetables locally, LEISA India, September, 2020